# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**पुणे शहरातील रुग्णालयांनी कॅशलेस विमा योजना बंद केल्याबाबत**

**(१) ६२८६ (०६-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील उपचाराच्या दरावरुन विमा कंपन्या आणि रुग्णालयातील डॉक्टर यांच्यातील वाद विकोपाला गेल्याने दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजीपासून शहरातील कॅशलेस विमा योजना रुग्णालयांनी बंद केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा असताना ही उपचारासाठी रुग्णांना पैसे भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमाधारकांचे हक्क जपण्याची जबाबदारी इन्शुरन्स रेग्युलेटरी अॅण्ड डेव्हलपमेंट अॅथॉरिटीची असल्याने पुणे शहरातील इन्शुरन्स अॅकॅडमी पुणे व सजक नागरीक मंच यांनी तातडीने हा प्रश्न सोडविण्याची मागणी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी आय.आर.डी.ए.कडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) विमा सेवेबाबत आयआरडीए (Insurance Regulatory and Development Authority of India) हे नियंत्रक प्राधिकरण असून आयआरडीए ही संस्था केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या अखत्यारित आहे. सदरील प्रश्न केद्र शासनाच्या कार्यकक्षेतील आहे.

राज्य शासनाकडून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य विमा योजना राबविण्यात येते. सदर प्रश्न या योजनेशी संबधित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**मौजे निलज (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील जय गुरुदेव पाणी वापर संस्थाद्वारा संचालित तलावात मीनी उपसा सिंचन योजना वैनगंगा नदीवरुन सुर करण्याबाबत**

**(२) ४७५५१ (३०-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निलज बु. (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील जय गुरुदेव पाणी वापर संस्थाद्वारा संचालित तलावात मीनी उपसा सिंचन योजना वैनगंगा नदीवरुन सुरु करण्याबाबत दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०२-२०१८) :** (१) होय, असे निवेदन दि.२६/५/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे.

(२) सदर मागणीचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, गोंदिया यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंदाजपत्रक तयार करुन अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांना सादर केले होते. सदर अंदाजपत्रकात त्रुटी असल्याने त्रुटीपुर्ततेची कार्यवाही विभागीय कार्यालयाकडून प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे लाळी खु. (ता.जळकोट) येथील तिरु नदीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत**

**(३) ७१६७२ (२७-०१-२०१७). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाळी खु. (ता.जळकोट) येथील तिरु नदीच्या बुडीत क्षेत्रात गाळ साचल्यामुळे या नदीच्या शेजारील शेतात पाणी जावून मोठे नुकसान होत असल्यामुळे या नदीचे रुंदीकरण व खोलीकरण करावे यासाठी लोकप्रतिनिधी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नदी काठच्या तीन गावाना पिण्यासाठी पाणी पुरवठयासाठी निधी उपलब्ध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिरु नदीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (२७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. तथापि तीन गावांपैकी लाळी खु. या गावाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रम कृति आराखडा सन २०१७-१८ अंतर्गत करण्यात आलेला आहे.
(३) जलसंधारण विभाग दि. १० ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत तिरू नदी पुनर्जीवनास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देसाईगंज (जि.गडचिरोली) तालुक्यात सन २०१२-१६ या कालावधीत सिंचन विभागामार्फत करण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यांची निर्मिती आणि दुरुस्तीबाबत**

**(४) ७२२८३ (१६-१२-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यात सन २०१२-१६ या कालावधीत सिंचन विभागामार्फत किती कोल्हापूरी बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरूस्ती करीता निधी खर्च करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती बंधाऱ्यांची दुरूस्ती करण्यात आली असुन त्यावर किती निधी खर्च करण्यात आला,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०३-२०१८) :** (१) देसाईगंज तालुक्यात सन २०१२ ते २०१६ या कालावधीत एकूण १० कोल्हापूरी तथा साठवण बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये मांगद, नरोटीचक, पिंपळगांव, विहीरगांव या ०४ बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली असून त्यावर रु.१०.०० लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जांभूळपाणी (ता.मोहाडी) येथील लघु पाटबंधारे तलाव वरसलांगाची दुरुस्ती करणेबाबत**

**(५) ७२८९९ (२७-०१-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांभूळपाणी (ता.मोहाडी) लघु पाटबंधारे येथील लघु पाटबंधारे तलाव वरसलांगाची दुरुस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण मंत्री यांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार, सदर काम पूर्ण करणेकरिता अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांना मा.जलसंधारण मंत्री यांनी कार्यवाहीचे निर्देश देऊनही अद्याप कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

अध्यक्ष / सचिव, जयगुरूदेव पाणी वापर सहकारी संस्था, निलज बु. तालुका मोहाडी यांनी मौजा जांभूळपाणी ता. मोहाडी येथील तलावाचे वरसलांगाची दुरूस्ती करण्याबाबत दिनांक १३/०६/२०१६ च्या पत्रान्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,भंडारा या कार्यालयास कळविले आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. २८४९/२०१३, दिनांक ०५/०९/२०१३ अन्वये सदर तलावाच्या दुरूस्तीचे प्राकलनास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. परंतु सन २०१७ - १८ मध्ये सदर गाव जलयुक्त शिवार अभियानामध्ये निवड करण्यात आल्यामुळे सदर कामांचे दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करून कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करून जलयुक्त शिवार जिल्हा स्तरीय समितीचे प्रशासकिय मान्यता आदेश क्र. ३५५ दिनांक २९/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून निविदा प्रक्रिया सुरू आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करून दुरूस्ती कामास सुरूवात करण्याचे नियोजन आहे.

---

## बागलाण, दिंडोरी, पेठ, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील पाझर तलावांसाठी भूसंपादित जमिनींचा वाढीव मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत

**(६) ७४५७४ (१४-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील ल.पा. (प) विभाग, जि.प. विभागातंर्गत सन १९९७-१९९८ मध्ये बागलाण, दिंडोरी, पेठ, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पाझर तलावांसाठी भूसंपादित जमिनींचा वाढीव मोबदला शेतकऱ्यांना अदा केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा मोबदला शेतकऱ्यांना अदा करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शेतकऱ्यांना मोबदला तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-०२-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) होय.

लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग, जिल्हा परिषद, नाशिक या विभागांतर्गत -

अ) बोपेगाव पाझर तलाव ता. दिंडोरी या प्रकल्पास शासन निर्णय क्र. मजम-२०१५/ प्र.क्र. २०१६/जल-३, दि. २१/१/२०१६ अन्वये, व

आ) बिल्वतीर्थ साठवण तलाव, ता. त्र्यंबकेश्वर या प्रकल्पास शासन निर्णय क्र. भूसंपा-२०१६ /प्र.क्र. २४६/जल-४, दि. २१/१/२०१७ अन्वये भूसंपादन मोबदला रक्कम मंजूर करण्यात आलेली असून सदर रक्कम न्यायालयात जमा करण्यात आली आहे.

इ) तसेच कावनाई पाझर तलाव  ता. इगतपूरी या प्रकल्पासाठी जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रूपये ६,६५,८००/- कोर्टात जमा करण्यात आलेली आहे.

ई) हातनोरे ता. दिंडोरी येथील पाझर तलावासाठी जमिनीचा मोबदला रक्कम रूपये ५,३१,०१६/- न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

उ) डोंगरेज ता. बागलाण येथील साठवण बंधारा कामासाठी जिल्हा परिषद सेसमधून रक्कम रूपये १,४८,९३५/- न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

ऊ) नळवपाडा ता. दिंडोरी येथील जमिनीचा वाढीव मोबदला पोटी जिल्हा परिषद सेसेमधून रक्कम रूपये ३,५१,६३८/- दिवाणी न्यायालय, नाशिक येथे जमा करण्यात आलेले आहे.

ओ) जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून प्राप्त प्रश्नांकित तालुक्यातील भुसंपादन प्रस्तावांपैकी काही भुसंपादन प्रकल्पास नियोजन विभाग/ रोहयो अंतर्गत प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. यास्तव सदर प्रस्ताव विहित कार्यपदधतीनुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियोजन विभाग (रोहयो) यांचेकडे पाठविण्यासाठी दिनांक १६/०१/२०१७ च्या शासन पत्रान्वये कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग, जिल्हा परिषद, नाशिक कार्यालयास मूळ प्रतीत परत पाठविण्यात आले आहेत.

---

## विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीकरीता निधी देण्याबाबत

**(७) ७६४७६ (१९-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर या जिल्ह्यांत जिल्हा परिषदेकडे व्यवस्थापनाकरीता ० ते १०० हे. सिंचन क्षमतेचे एकूण ६७३४ माजी मालगुजारी तलाव असून त्यापैकी २१६८ माजी मालगुजारी तलाव नादुरुस्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावांच्या दुरुस्तीसाठी प्रस्तावीत रक्कम ३७२ कोटी रु. असून २०१५-१६ मध्ये १०० कोटी रु. इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत किती माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्यात आली आणि त्यावर जिल्हानिहाय किती खर्च करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०३-२०१८) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेकडे व्यवस्थापना करिता असलेल्या ६७३४ माजी मालगुजारी तलावांपैकी ४०३६ माजी मालगुजारी तलाव नादुरूस्त आहेत.

तसेच सदर तलावांच्या दुरूस्ती व पुनर्स्थापनेसाठी रू.७५० कोटी निधी प्रस्तावित आहे व सन २०१५ - १६ मध्ये १०० कोटी रू. इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला होता.

(३) व (४) सद्य:स्थितीत विदर्भातील जिल्हा परिषदेकडे व्यवस्थापनाकरिता असलेल्या ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या माजी मालगुजारी तलावांच्या दुरूस्ती कामांची प्रगती पुढीलप्रमाणे आहे :-

**अ) लघुसिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद विभाग, नागपूर** :- यांचे अंतर्गतील एकुण ४२ दुरूस्ती कामांपैकी ३५ कामे प्रगतीपथावर असून ०७ कामे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या कामांवर रू. २८.६० लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**ब) लघुसिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद विभाग, भंडारा** :- यांचे अंतर्गतील एकुण २३३ दुरूस्ती कामांना प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

**क) लघुसिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद विभाग, गोंदिया** :- यांचे अंतर्गतील एकुण ४१८ दुरूस्ती कामांना प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

**ड) लघुसिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद विभाग,चंद्रपूर** :- यांचे अंतर्गतील एकुण ४१४ दुरूस्ती कामांपैकी ३६ कामे प्रगतीपथावर आहेत.

**ई) लघुसिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद विभाग, गडचिरोली** :- यांचे अंतर्गतील एकुण १५८ दुरूस्ती कामांपैकी १७ कामे प्रगतीपथावर आहेत.

---

## वरोरा (जि.चंद्रपूर) येथे उपजिल्हा रूग्णालयात साप चावलेल्या व्यक्तींवर वैदयकीय अधिकाऱ्यांचे समक्ष तंत्र-मंत्राव्दारे उपचार केल्याने त्या व्यक्तीचा झालेला मृत्यू

**(८) ७९८४७ (१८-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथे उपजिल्हा रूग्णालयात साप चावलेल्या व्यक्तींवर वैदयकीय अधिकाऱ्यांचे समक्ष तंत्र-मंत्राव्दारे उपचार केल्याचे कारणास्तव मृत्यू झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, दोषी वैदयकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार या प्रकरणात दोषी आढळून आलेले कक्ष सेवक यांची सेवा चिमूर येथे संलग्न करून त्यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे. तसेच २०१७ च्या सर्वसाधारण बदली सत्रामध्ये त्यांची सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे.

तसेच डॉ. मडावी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अचलपूर (जि. अमरावती) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(९) ८१२८९ (१८-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि. अमरावती) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणी संदर्भात सदर लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री वैद्यकीय शिक्षण यांना दिनांक २३ जून २०१५ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणावर आदिवासी व दुर्गम भाग असल्यामुळे या बहुगत रुग्णांना योग्य उपचार मिळावेत यासाठी हे महाविद्यालय तातडीने सुरु करण्याची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय

(४) अचलपूर (जि.अमरावती) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची बाब तूर्त शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे एका युवकाचा झालेला मृत्यू**

**(१०) ८१४५९ (१९-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे वृषभ कुरसंगे नामक १७ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) हे, खरे नाही.

(२) सदर प्रकरणी रुग्णाचा मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी संतापून संबंधीत डॉक्टर विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिक्षक, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांच्या अध्यक्षतेखाली संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांनी चौकशी समिती गठीत केली होती.

उक्त चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार कोणीही दोषी आढळून न आल्याने, कारवाई करण्यात आलेली नाही.

तथापि, मृत व्यक्तीच्या वडिलांनी प्रेताचे शवविच्छेदन सेवाग्राम रुग्णालयात करण्याविषयी आक्षेप घेतल्याने सामान्य रुग्णालय, वर्धा येथे शव विच्छेदन करण्यात आले आहे.

शव विच्छेदन अहवाल प्राप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये व्हिसेरा रासायनिक पृथ:करणासाठी प्रयोगशाळा नागपूर व histopathology अहवाल मिळविण्यासाठी शासकीय वेद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे सॅम्पल तपासणीकरिता पाठविलेले आहे. अहवाल अप्राप्त आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील पैनगंगा नदी पुर्नजिवन कार्यक्रमास प्राधान्यतेने मान्यता मिळणेबाबत**

**(११) ८२१२६ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलसंधारण विभागने नपुया/प्र.क्र.६२२/दिनांक १५/०२/२०१६ अन्वये राज्यात नदी पुर्नजिवन कार्यक्रम सुरु केला असून सदर संदर्भानुसार वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदी पुर्नजिवन कार्यक्रमास विशेष बाब म्हणुन प्राधान्यतेने मान्यता देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनीधींने दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ च्या दरम्यान निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाचे दि.१८ ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत नाला उपचार कामाबरोबरच क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, वाशिम यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निरुळ गंगामाई (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या कामाची निविदा मंजूर करण्याबाबत**

**(१२) ८२२३५ (१८-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निरुळ गंगामाई (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाअंतर्गत कोल्हापूरी पध्दती बंधाऱ्याच्या या कामाची निविदा मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंधारण मंत्री यांना दिनांक १७ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०३-२०१८) :** (१) नाही. मात्र मा. आमदार ॲड. यशोमती ठाकूर तिवसा यांनी दि. २३.१.२०१७ अन्वये मा. अधिक्षक अभियंता सिंचन जलसंपदा मंडळ अमरावती यांना पत्राव्दारे तात्काळ कार्यवाहीबाबत कळविले आहे.
(२) मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेकडून प्राप्त झालेला निविदा किंमतीवर ४.९५ टक्के अधिक्याचा (रु.२०.१७ लक्ष) प्रस्ताव अस्वीकृत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील शासकीय व महापालिका रुग्णालयामध्ये एम.आर.आय. व सिटीस्कॅनसाठी रुग्णांच्या प्रतीक्षायादीत होत असलेली वाढ**

**(१३) ८४८२९ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय व महापालिका रुग्णालयामध्ये एम.आर.आय. व सिटीस्कॅनसाठी रुग्णांना संबधित विभागाकडून तीन ते चार महिन्यानंतरच्या तारखा देण्यात येत असल्याची बाब माहे जून, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकारची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सर जे.जे.समुह रुग्णालयात सीटी स्कॅनसाठी ओपीडीच्या रुग्णांना साधारण १५ दिवसानंतरची तारीख देण्यात येते. तर आंतर रुग्णांस २ दिवसानंतरची तारीख देण्यात येते. रुग्ण अस्वस्थ किंवा अत्यावस्थ असल्यास त्याला सीटी स्कॅन द्वारे उपचार करणे आवश्यक असल्यास तातडीची बाब म्हणून चाचणी/तपासणी करण्याकरीता घेतले जाते.

एम.आर.आय.साठी ओ.पी.डी.च्या रुग्णांची साधारण तीन महिन्याची प्रतिक्षा यादी आहे, तर आंतर रुग्णांची ७ ते १० दिवसांची प्रतिक्षा यादी आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आंतररुग्णांना एमआरआय/सीटी स्कॅन चाचण्या १-२ दिवसांमध्ये करण्यात येतात. बाहयरुग्णांच्या गरजेनुसार १-२ महिन्यांच्या कालावधीमध्ये करण्यात येतात. अपघातग्रस्त व गंभीररित्या आजारी रुग्णांना सदर चाचण्यांकरीता प्रथम प्राधान्य देण्यात येते. बी.एम.सी. च्या काही रुग्णालयांमध्ये सी.टी.स्कॅन त्वरीत करुन दिली जाते. त्याकरीता प्रतिक्षा यादी नाही.
(२), (३) व (४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये नविन एम.आर.आय., सिटी स्कॅन, डीएसए मशीन्स खरेदी करण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुरु आहे.

---

## राज्यातील जलयुक्त शिवारांच्या कामाबाबत

**(१४) ८६६०१ (१९-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जलयुक्त शिवारांच्या कामाची प्रगती व किती जलयुक्त शिवारांची कामे पुर्ण झाली आहेत याची पाहणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मराठवाड्यात दौरा केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती जलयुक्त शिवाराची कामे पुर्ण झाली आहेत व किती कामे अपुर्णावस्थेत आहेत,
(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील भूम तालुक्यातील जलयुक्त शिवाराच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (१२-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मराठवाड्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मधील एकूण ८००८८ कामापैकी ७९५४६ कामे पूर्ण झाली असून ५४२ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सन २०१६-१७ मधील एकूण ५०९७५ कामापैकी ४३३०८ कामे पूर्ण झाली असून ७६६७ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) उस्मानाबाद जिल्हयातील भूम तालुक्यात जलयुक्त शिवार शिवार अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये सर्व यंत्रणांची एकूण २२५५ कामे प्रस्तावित करण्यात आली होती त्यापैकी ८९४ कामे पूर्ण करण्यात आली असून १११७ कामे प्रगतीपथावर आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यापासूनच पाऊस सुरू झाल्याने व प्रक्षेत्रावर पिके असल्याने कामे पूर्ण होण्यास कालावधी लागत आहे.

---

### राज्यात अनुक्रमे अभिमत व खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर वैद्यकीय व दंतचिकित्सा अभ्यासक्रमाबाबत

**(१५) ८८४१७ (११-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुक्रमे अभिमत व खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर वैद्यकीय व दंतचिकित्सा अभ्यासक्रमासाठी राज्यातील पात्र छात्रांना (निमिष्ठानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या बरोबरीने) किमान ५० टक्के प्रवेश क्षमता राखून ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, जनप्रतिनिधी, रहिवाशी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण), मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण), मुख्य सचिव, प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण), आणि वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, संबंधित आरोग्य विद्यापीठांचे कुलसचिव आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांनी दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील अधिवासी उमेदवारांसाठी वैद्यकीय/दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशामध्ये जागा राखीव ठेवण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल,२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशाद्वारे स्थगिती दिली असून सदर प्रकरण सध्या मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे. तथापि, न्यायालयात प्रकरण सुरु असताना व उक्त शासन निर्णयास स्थगिती असतांनादेखील सन २०१८-१९ पासून अधिवासी उमेदवारांकरिता पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशामध्ये जागा राखीव ठेवता येतील किंवा कसे, याबाबत कायदेशीर बाबींची तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव (जि.अहमदनगर) येथे बोगस दवाखाना चालविणाऱ्या तोतया डॉक्टरास पकडल्याबाबत**

**(१६) ८८५९३ (२१-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामपंचायतच्या कार्यालयाच्या मागे बेकायदेशीररित्या दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टराला गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकिय अधिकारी आणि पोलीसांच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईत पकडल्याचे दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित बोगस डॉक्टराकडे औषधगोळया आणि इंजेक्शन वापरण्याचे प्रमाणपत्र नसतानाही ॲलोपॅथीक औषध रुग्णांना देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मेडिकल प्रॅक्टीसनर्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय,

सदर व्यक्ती अपुर्व वैद्यनाथ मंडळ यांचे विरुध्द महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीसनर्स ॲक्ट १९६१ चे कलम ३३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**तलासरी (जि.पालघर) येथे शासकीय ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(१७) ८९८४७ (१९-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात तलासरी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात एकूण २७ पदे मंजूर असून १४ पदे भरलेली आहेत तर वैदकीय अधीक्षक-१, वैदकीय अधिकारी-२, सहायक अधीक्षक-१, कनिष्ठ लिपिक-१, क्ष-किरण तंत्रज्ञ-१, प्रयोग शाळा तंत्रज्ञ-१, प्रयोग शाळा सहायक-१, वाहनचालक-१, कक्षसेवक-१, शिपाई-१, सफाईगार-१ अशी एकूण १३ पदे ही अद्याप रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे कधीपर्यंत भरली जाणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय तलासरी येथील मंजूर भरलेली व रिक्त पदांची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.:

| अ.क्र. | पदाचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ | १ | ० | १ |
| २ | वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ | ३ | १ | २ |
| ३ | अधिपरिचारका | ७ | ६ | १ |
| ४ | औषधनिर्माण अधिकारी | १ | १ | ० |
| ५ | प्रयोगशाळा तत्रज्ञ | १ | १ | ० |
| ६ | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | १ | ० |
| ७ | सहा. अधिक्षक | १ | १ | ० |
| ८ | प्रयोगशाळा सहायक | १ | ० | १ |
| ९ | कनिष्ठ लिपिक | १ | १ | ० |
| १० | लिपिक-टंकलेखक | १ | १ | ० |
| ११ | नेत्र चिकित्सा अधिकारी | १ | १ | ० |
| १२ | वाहन चालक | १ | ० | १ |
| १३ | शिपाई | १ | ० | १ |
| १४ | कक्षसेवक | ४ | २ | २ |
| १५ | सफाईगार | २ | १ | १ |
| एकूण | | २७ | १७ | १० |

(२) व (३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) या संवर्गातील तलासरी (जि. पालघर) शासकीय ग्रामिण रुग्णालयामध्ये ०३ मंजूर पदे असून ०१ पद भरलेले आहे. तसेच प्रतिनियुक्तीने एका वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) या संवर्गातील रिक्त पदावर दि. ०४ व ०५ डिसेंबर, २०१७ रोजी समुपदेशनाव्दारे एकूण ३३८ उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच १५.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिर्घकाळ गैरहजर असणाऱ्या ८१ वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुजू करुन देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच, गट-क व गट-ड संवर्गातील आरोग्य सेवेतील रुग्णसेवेशी संबंधीत ७५ टक्के पदे भरण्याची कार्यवाही (कोल्हापूर परिमंडळ वगळून) पूर्ण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक पदासह विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१८) ९१०१६ (१९-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर जिल्हा रुग्णालय केवळ एका डॉक्टरवर सुरु असून रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक पदासह विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात सोयी सुविधा उपलब्ध असतांना कर्मचा-यांच्या रिक्त पदामुळे मशीन विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे येथील गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करुन घ्यावा लागत असून रुग्णांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन रुग्णालयाचे रिक्त पदे भरण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण १४ पदे मंजूर असून त्यापैकी, मे, २०१७ अखेर ८ पदे भरलेली आहेत. रुग्णालयातील विविध संवर्गातील (गट-अ ते गट-ड) एकूण १०० पदे मंजूर असून, त्यापैकी सद्य:स्थितीत वैद्यकीय अधिक्षकासह ७९ पदे भरलेली आहेत. तसेच जिल्हा निवड समिती सोलापूर मार्फत अजून २ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही,

उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली असून, याव्यतिरिक्त एनएचएम/आयपीएचएस अंतर्गत एकूण ४५ विशेषज्ञ / वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरण्यात आलेली असल्याने मशिन विनावापर पडून नाहीत.

(३) हे खरे नाही.

रुग्णालयात रुग्णांना २४ तास सेवा उपलब्ध करुन देणारा विभाग कार्यान्वीत असून, त्या सुविधेचा रुग्ण वेळोवेळी लाभ घेत आहेत.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच गट-क व गट-ड मधील मंडळ स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली असून, सदर पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात नाला सरळीकरण व सिमेंट बंधारे या कामावर अधिक रुपये खर्च करण्यात आल्याबाबत**

**(१९) ९१०५७ (१९-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) " माथा ते पायथा " हे मुख्य सूत्र ठरवून शासनाने जलयुक्त शिवार योजना सुरु केली असतांना लातूर जिल्हयात नाला सरळीकरण व सिमेंट बंधारे या कामावर अधिक रुपये खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या सूत्रानुसार शिवारातील पाणी शिवारात मुरविण्याकरिता शेताच्या कंपार्टमेंट बंडिग कामावर कोटयवधी रुपये खर्च करण्यात आली असून त्यात यंत्राने कामे करुन मनुष्यबळाचा वापर केल्याचे दाखवून शासनाची फसवणूक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) लातूर जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ व २०१६-१७ अंतर्गत लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात नाला खोलीकरण व सरळीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत. या नाला खोलीकरण झालेल्या व नैसर्गिक नाल्यावर सिमेंट नाला बंधाऱ्याची सन २०१५-१६ मध्ये ३६३ कामांवर रू.१५.५३ कोटी तसेच सन २०१६-१७ मध्ये १५८ कामांवर रू.१३.७५ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

कंपार्टमेंट बंडिंगची कामे शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ई - निविदा पद्धतीने जेसीबी/पोकलेन या यंत्राच्या सहाय्याने करण्यात आली आहेत. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडलेल्या गावामध्ये ज्या ठिकाणी मग्रारोहयो अंतर्गत कामे झालेली आहेत अशा ठिकाणी मजुरांमार्फत कामे करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हदगाव (जि.नांदेड) येथील वन विभागाच्या वन परिक्षेत्रात शेतक-यांच्या उभ्या पिकात वन अधिका-यांनी मशिन घालून लाखो रुपयांचे नुकसान केल्याबाबत**

**(२०) ९११०० (११-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) येथील वन विभागाच्या वन परिक्षेत्रात शेतकऱ्यांच्या उभ्या पिकात वन अधिकाऱ्यांनी मशिन घालून लाखो रुपयांचे नुकसान केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या मशिन कंत्राटदारांना त्यांची देयके तातडीने अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी मा.वनेमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या तक्रारीनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०२-२०१८) :** (१) हदगाव वन परिक्षेत्रातील मनाठा गावातील २० हे. आर वन क्षेत्रावर अतिक्रमण धारक शेती करीत होते, जानेवारी, २०१७ मध्ये वनक्षेत्रातील अतिक्रमण काढण्यात आले मात्र त्यावेळी सदरील क्षेत्रात शेतकऱ्यांचे कोणतेही उभे पिक नव्हते. त्यामुळे वन अधिकाऱ्याने मशिन घालून लाखो रुपयांचे नुकसान केले हे खरे नाही.
(२) अतिक्रमण क्षेत्रात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत ई-निविदा व्दारे केलेल्या कामाचे प्राप्त निधी नुसार संबंधित ठेकेदाराने विहित काल मर्यादेत काम पूर्ण केल्याने त्यांना त्यांच्या कामाची रक्कम नियमानुसार अदा करण्यात आली.
(३) सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनाळा (जि.बुलढाणा) गावलगत ७ कि.मी. अंतरावर अंबाबरवा अभयारण्यातील वसलेल्या शेंबा व गुमटी या दोन आदिवासी गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२१) ९३५४० (२१-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनाळा (जि.बुलढाणा) गावलगत ७ कि.मी. अंतरावर अंबाबरवा अभयारण्यातील वसलेल्या शेंबा व गुमटी या दोन आदिवासी गावांचे पुनर्वसन करण्याचे शासनाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदिवासींना पुनर्वसनासाठी १० लाख रुपयांचा मोबदला देण्यात येणार असून काही व्यापाऱ्यांनी त्यांची पासबुक स्वतःकडे घेतल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती आदिवासींचे पासबुक स्वतःकडे घेतलेल्या व्यापाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सोनाळा (जि.बुलढाणा) गावालगत अंबाबरवा अभयारण्यातील शेंबा व गुमटी या दोन वस्त्या रोहीणखिडकी या गावाचे नावाने ओळखल्या जातात. मौज रोहीणखिडकी या गावाचे पुनर्वसन दिनांक १४.६.२०१७ रोजी पुर्ण करण्यात आले असून, एकूण ५९४ कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

(२) पुनर्वसनापोटी प्रत्येक पात्र कुटूंबाला रु.१०.०० लक्ष देण्यात येतात हे खरे आहे. परंतू काही व्यापाऱ्यांनी त्यांचे पासबुक स्वत:कडे घेतल्याची तक्रार माहे जुन, २०१७ वा त्या दरम्यान प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मौजे जामठी (ता.जि.बुलडाणा) येथील वन्य प्राण्याच्या हल्ल्यात**
**अंपगत्व आलेल्या बालिकेस मदत मिळण्याबाबत**

**(२२) ९४८२९ (२४-१०-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जामठी (ता.जि.बुलडाणा) येथील कु. दैवशाला विलास पवार या बालिकेस साडेचार वर्षापूर्वी हिंस्त्र वन्य प्राण्याच्या हल्ल्यामुळे अपंगत्व आल्यानंतर अद्यापही शासकीय मदत मिळाली नसल्याचे दिनांक १० जुलै २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी बालिकेस सानुग्रह अनुदान व इतर लाभ देण्याबाबत दिनांक १३ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे पत्रान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अंपगत्व आलेल्या बालिकेस सानुग्रह अनुदान व इतर लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) श्री.गोविंदा देवाजी पवार यांची नात कु.दैवशाला विलास पवार हिला मुंगुस या प्राण्याने तोंडाला चावा घेऊन नाक, गाल व कान कुरतुडुन खाल्ले. याकरिता मदत मिळणेबाबत त्यांनी दिनांक ०८.०५.२०१४ रोजी उपवनसंरक्षक, बुलडाणा यांचेकडे अर्ज सादर केला होता.

शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी-१००८/ प्र.क्र.२७ / फ-१, दिनांक ०२.०७.२०१० नुसार वाघ, बिबट, अस्वल, गवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) या प्राण्याने हल्ला केल्यास अर्थसहाय्य देण्याची तरतूद आहे. तथापि सदर शासन निर्णयात मुंगुस या वन्यप्राण्यांचा समोवश नसल्याने प्रस्तुत प्रकरणी अर्थसहाय्य अनुज्ञेय ठरत नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३.०७.२०१७ चे पत्रान्वये सदर प्रकरण तात्काळ निकाली काढण्याबाबत उपवनसंरक्षक, बुलढाणा यांना विनंती केली आहे.
(३) दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयात मुंगुस या वन्यप्राण्यांचा समोवश नसल्याने अर्थसहाय्य अनुज्ञेय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे किर्तांगळी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील साठवण बंधाऱ्याचे काम गत दोन वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२३) ९५४०१ (२६-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किर्तांगळी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील साठवण बंधाऱ्याचे काम गत दोन वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याची बाब दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार कामे प्रलंबित ठेवणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
मौजे किर्तांगळी येथे लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक मार्फत कोल्हापूर पदधतीच्या बंधाऱ्याचे काम सुरू असून सदर काम जून, २०१७ पासुन पावसाळयामुळे ठेकेदाराकडून बंद ठेवण्यात आलेले होते. सदयस्थितीत जवळपास ९०% काम पुर्ण झालेले असून बंधाऱ्याचे स्तंभावरील स्लॅब टाकण्याचे काम बाकी आहे. प्रस्तुत काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक २०/१०/२०१७ पर्यंत होता,परंतु क्षेत्रीय परिस्थितीनुसार सदर कामाचे परिणामात वाढ झाल्याने विषयांकित योजनेचा रक्कम रू. ४४९.८२ लक्ष चा सुधारित प्रशासकिय मान्यतेचा प्रस्ताव लवकर शासनास सादर करून योजनेचे काम सन २०१८ चे पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे क्षेत्रीय कार्यालयाचे नियोजन आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गत वर्षभरात वाघांच्या झालेल्या मृत्युबाबत**

**(२४) ९५५१३ (२६-१२-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षभरात ७ वाघ आणि १२ बिबटयांचा मृत्यू शेतातील कुंपणात वीज प्रवाहामुळे झाल्याचे दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच विदर्भातील विविध जंगलांत मागील आठ महिन्यांत १२ वाघांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत वाघांचा मृत्यू कोणत्या कारणाने झाला याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाघांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) राज्यात जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत १ वाघ व २ बिबट यांचा शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे मृत्यु झालेला आहे.
(२) विदर्भातील विविध जंगलात माहे जानेवारी, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ या आठ महिन्यांच्या कालावधीत नैसर्गिकरीत्या १०, शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे २ तर इतर ३ असे एकूण १५ वाघांचे मृत्यु झालेले आहेत.
(३) व (४) आपसी झुंज, आजरपण, वृध्दापकाळ अशा विविध कारणामुळे १० वाघांचा नैसर्गिकरीत्या मृत्यु झाला आहे.

शेतात लावलेल्या विद्यृत प्रवाहाने खालीलप्रमाणे २ वाघांचा मृत्यु झाला आहे.

• नागपूर वनविभागातील खापा वनपरिक्षेत्रातील श्री.बुरडे रा.खापा यांचे शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहाने दिनांक १३.०१.२०१७ रोजी एका वाघीणीचा मृत्यु झाला असून प्रस्तूत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार दोन इसमांविरुध्द वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
• ब्रम्हपुरी वनविभागातील नागभिड वनपरिक्षेत्रातील श्री. महादेव बाबुराव इरपाते रा. कोथुळणा यांचे शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहाने दिनांक २०.०४.२०१७ रोजी एका वाघाचा मृत्यु झाला असून प्रस्तूत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार तीन इसमांविरुध्द वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील पूर्व पेंच पिपरिया येथे दिनांक २६/६/२०१७ रोजी गस्ती दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी (वन्यजीव) यांनी वाघाची हाडे, नखे व दात जप्त केली. त्या अनुषंगाने दिनांक २६.०६.२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी पुढील चौकशी दरम्यान एकूण ३ वाघांच्या मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त प्रकरणांमध्ये १७ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील मजुर कामगार सहकारी संस्थांमार्फत केलेल्या वन विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२५) ९५६२४ (२६-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मजूर कामगार सहकारी संस्थामार्फत वन विभागात केलेल्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी विभागीय वन अधिकारी (दक्षता) ठाणे यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने चौकशी करुन आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीने निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) विभागीय वनअधिकारी (दक्षता), ठाणे यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार रु.३.०० लक्ष रकमेवरील किंमतीच्या कामांसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक होते. तथापी अशा कामासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब केला नसल्याचे दिसून येते.

त्यामुळे सदर कामांतील कार्यप्रणालीमध्ये अनियमितता झाली आहे.

अनियमिततेच्या अनुषंगाने चौकशी अहवालामध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकारी /कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत दिनांक ०३.०३.२०१८ अन्वये ४ वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कारणेदर्शक सूचना बजावण्यात आल्या. त्यापैकी २ वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरबाड यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम-१० अन्वये दोषारोप ठेवण्यात आले असून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त तत्कालीन उपवनसंरक्षक, ठाणे हे पण जबाबदार आहेत किंवा कसे, याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

---

**पेड (ता.तासगांव, जि.सांगली) येथील पर्यटनस्थळाच्या एका इमारतीवर वृक्ष कोसळून नुकसान झाल्याबाबत**

**(२६) ९५८६५ (०६-०१-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेड (ता.तासगांव, जि.सांगली) येथे सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च उभारलेल्या पर्यटनस्थळाच्या एका इमारतीवर भला मोठा वृक्ष कोसळून पडल्याने इमारतीची मोडतोड झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वन व पाटबंधारे विभागाकडे तक्रार करुनही सदर वृक्ष हटविण्याकडे विभागाने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नैसर्गिक पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी तत्कालीन ग्रामीण विकास व पाणीपुरवठा मंत्री यांनी लाखो रुपयांचा निधी मंजूर करुन त्यामध्ये प्रामुख्याने झुलता पूल, बागबगीचा, विश्रामगृह, कॅन्टीन, हॉटेल यासह अन्य विकासावर लाखो रुपये खर्च केले परंतु अद्याप अनेक विकास कामे प्रलंबित असल्याने हे पर्यटनस्थळ ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार वृक्ष कोसळून नुकसान झालेल्या इमारतीची दुरुस्ती करण्यासह इमारतीवर कोसळलेल्या वृक्षास हटविण्यास विलंब लावणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०३-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.

इमारतीचे बाजूस निलगिरी या जातीचे झाड इमारतीकडे कललेले होते. कललेल्या अवस्थेत असताना भविष्यात अपघात / नुकसान होऊ नये म्हणून पाटबंधारे विभाग, तासगांव यांचेमार्फत झाडांची तोड करुन माल इमारतीच्या लगत गट करुन रचून ठेवलेला आहे.
(३) व (४) पेड पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती सांगली यांच्याकडून प्राप्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करुन त्यांच्यामार्फत पर्यटन विकास कामे करण्यात आलेली आहेत. तथापि अद्याप काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वन विभागाच्या ताब्यात आलेली नसल्याने पेड पर्यटन स्थळ संयुक्त वन व्यवस्थापन समिती, पेड यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंरक्षित क्षेत्रातील आदिवासींचे पुनर्वसन अकोला जिल्हयात करण्यात आलेल्या आदिवासींची गैरसोय होत असल्याबाबत

**(२७) ९६०२५ (२६-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंरक्षित क्षेत्रातील ८ गावांचे पुनर्वसन अकोला जिल्हयात करण्यात आले मात्र पुनर्वसित गावातही आदिवासींचे आरोग्य सुविधांच्या अभावाने हाल होत असल्याने आदिवासी पुन्हा जंगलाकडे वळू लागला असल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पुनर्वसित गावातील आदिवासींना सोयीसुविधांचा लाभ मिळण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०३-२०१८) :** (१) व (२) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे धोकाग्रस्त व्याघ्र अधिवास क्षेत्रातील ७ गावे अकोला जिल्ह्यात तर १ गाव अमरावती जिल्ह्यामध्ये पूनर्वसीत झाले आहेत. सदर गावातील आदिवासींचे आरोग्य सुविधांचा अभावाने हाल होत आहेत, असे निदर्शनास आलेले नाही. पुनर्वसीत झालेल्या ७ गावांमध्ये आरोग्य केंद्राचे सेवक / सेविका कार्यरत असून मौजा बारुखेडा व नागरतास ही गावे दानापुर ता. तेल्हारा, जि. अकोला तर उर्वरित गावे मुडगव ता. आकोट जि. अकोला या आरोग्य केंद्राशी जोडण्यात आलेले आहेत.

सदर ८ गावांतील व्यक्तीनी पूनर्वसनाकरीता पर्याय I निवडला आहे. त्यामध्ये प्रति कुटुंबास रु. १०.०० लक्ष रक्कम घेवून स्वत: पुनर्वसीत होण्याची तरतूद आहे.

पूनर्वसीत झालेल्या ७ गावांमध्ये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे दिनांक १८/०९/२०१७ रोजी संबंधित सर्व कार्यकारी यंत्रणा प्रमुख यांची बैठक होऊन, पुनर्वसित झालेल्या गावातील गावठाण क्षेत्रात नागरी सुविधा निर्माण करण्याचे दिले आहेत. सदर निर्देशाचे अनुषंगाने गावठाण क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणेकडून सुरू झालेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील हाफकिन प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील वाहतुकीसाठी असलेले रस्ते खड्डे पडून निकृष्ट झाल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठीचा प्रस्ताव

**(२८) ९६७२८ (२७-१२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील शिवडी विधानसभा मतदार संघात हाफकिन प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील वाहतुकीसाठी असलेले रस्ते खड्डे पडून निकृष्ट झाल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठीचा प्रस्ताव हाफकिन प्रशिक्षण संस्था प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी लागणारा निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करणारे पत्र मा.वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हाफकिन प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील रस्ता दुरुस्तीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रस्ते दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधी वैद्यकिय शिक्षण विभागाने उपलब्ध करुन दिला आहे काय वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०३-२०१८) :** (१) हाफकिन प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील रस्ते दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेला नाही.

तथापि, सहाय्यक अभियंता (श्रेणी-१), पूर्व (सा.बां.) उप विभाग, परळ, मुंबई यांचे दि.१०/०४/२०१७ च्या पत्रान्वये यासंदर्भातील प्रस्ताव हाफकिन संस्थेकडे सादर केला आहे.

(२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.३/८/२०१७ आणि दि.२१/८/२०१७ रोजी मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांना यासंदर्भात निवेदन दिले आहे.

(३) सहाय्यक अभियंता (श्रेणी-१), पूर्व (सा.बां.) उप विभाग, परळ, मुंबई यांनी हाफकिन संस्थेकडे संस्थेतील रस्ते दुरुस्तीबाबत सादर केलेले अंदाज या विभागास प्राप्त झाले आहे. सदर अंदाज (Estimates) सार्वजनिक बांधकाम विभागास तपासण्यासाठी सादर करण्यात आले आहे.

---

## नागपूर येथील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलन केल्याबाबत

**(२९) ९८५०० (२७-१२-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील निवासी डॉक्टरांनी माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात रजा आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामूहिक रजा आंदोलन केल्याने ३५० निवासी डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरच्या निवासी डॉक्टरांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयासह इतरही रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी मूक आंदोलन करुन काळ्या फिती लावून या आंदोलनात सहभाग घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निवासी डॉक्टरांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून तैनात सुरक्षा रक्षकांनी 'काम बंद' आंदोलन केले होते. त्या कारणास्तव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील निवासी डॉक्टर संपावर गेल्याची बाब खरी आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) निवासी डॉक्टरांनी सुरक्षेच्या अनुषंगाने मागणी केली आहे. त्यानुसार सुरक्षा रक्षकामध्ये वाढ करुन बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील कंत्राटी कामगारांना नियमित शासकीय सेवेत समावून घेणेबाबत**

**(३०) ९८८४० (२७-१२-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील कंत्राटी कामगारांना नियमित शासकीय सेवेत समावून घेणेबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी अकोला यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२ मार्च, २०१५ रोजी सदर कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी मंत्रालयात मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री ह्यांनी बैठक घेतली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार दोन वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे, खरे नाही.

(४) कंत्राटी तत्वावर नियुक्त कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबतचा निर्णय हा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व विधी व न्याय विभाग यांच्या अभिप्रायानुसार त्यावर मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही केली जात असून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करण्याबाबतचे प्रस्तावप्रत्र**

**(३१) ९८९१८ (२७-१२-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करण्याबाबतचे प्रस्तावप्रत्र दिनांक १४ जून, २०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावपत्रावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची बाब तूर्त शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) उप वनसंरक्षकाने १५ लाखाचे काम करण्याचा परवाना असलेल्या मजूर सहकारी संस्थेस २४ लाख ५५ हजाराचे काम दिल्याबाबत**

**(३२) ९९००९ (२६-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) उप वनसंरक्षकाने १५ लाखाचे काम करण्याचा परवाना असलेल्या मजूर सहकारी संस्थेस २४ लाख ५५ हजाराचे काम दिले असून ते काम करण्याकरीता वर्कऑर्डर सुद्धा दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०१८) :** (१) उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांचेकडून दोन वेगवेगळया कामाकरिता दोन वेगवेगळया ई-निविदा मागविण्यात आल्या. पहिली ई-निविदा रु.१४,६६,९३७/- ची व दुसरी ई-निविदा रु.९,८८,३२४/- ची होती.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर कामे ३० जून, २०१७ पर्यन्त पूर्ण करण्याचे निर्देश होते. सदर दोन्ही मंजूर ई-निविदा एकाच संस्थेच्या असल्याने दोन्ही ई-निविदा मध्ये नमूद कामाचा कार्यारंभ आदेश एकत्रीतरित्या एकाच पत्राद्वारे देण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दहेगाव (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांच्या शेतालगत सिमेंट बंधाऱ्याचे काम केल्याने जमिनीचे नुकसान झाल्याबाबत**

**(३३) ९९०२३ (२६-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दहेगाव (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील शेत सर्व्हे नं. ५१/१, ५१/२, ५१/३ या आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतालगत सिमेंट बंधाऱ्याचे काम केल्याने या तिन्ही शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व संबंधीत शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भायखळा (पूर्व), जे.जे. रुग्णालयाच्या आवारात, सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(३४) ९९१७९ (०३-०१-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भायखळा (पूर्व), जे.जे. रुग्णालयाच्या आवारात, सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या बांधकामाचा एकूण प्रस्तावित खर्च किती आहे, सदर रुग्णालयात कोणकोणत्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या बांधकामाकरीता, किती निधी केंद्र तथा राज्य सरकारने कोणत्या दिनांकास रुग्णालय प्रशासनास उपलब्ध करुन दिला आहे, सदर रुग्णालयाची कोणती संस्था व विकासकाम निविदा मंजूर करण्यात येवून, किती कालावधीत बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, सदरहू सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या बांधकामाबाबत, निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०३-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) सदर रुग्णालयाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर रुग्णालयात अतिविशेषोपचार रुग्ण सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक गावांत वन्यप्राण्यांकडून शेतपिकांची मोठया प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत**

**(३५) ९९३७७ (२६-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक गावांत वन्यप्राण्यांचा मुक्त संचार वाढला असून त्यांच्याकडून शेतपिकांची मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतीची नुकसान होऊ नये म्हणून शेतकरी शेतात राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या शेतपिकांची नुकसानभरपाई व वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) धर्माबाद तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपीकांचे नुकसान केल्याच्या सन २०१६-१७ मध्ये १०४५ प्रकरणे तर सन २०१७-१८ (माहे डिसेंबर, २०१७ अखेर) ७२३ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीन्वये संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना अनुक्रमे रु. २२.७५ लक्ष व रु. २६.१२ लक्ष नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(२) शेतपीकांचे वन्यप्राण्यांकडून नुकसान होवू नये म्हणून सोई सुविधेनुसार शेतकरी शेतात राहण्याची उपाययोजना करतात.
(३) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीन्वये संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनक्षेत्रात पाणवठे तयार करण्यात येतात.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात खाद्य उपलब्ध व्हावे म्हणून वनक्षेत्रात फळझाडांचे रोपवने तयार करण्यात येतात.
- वनक्षेत्रात गवत प्रजातींची लागवड करण्यात येते.
- वन्यप्राणी शेती व मानवी वस्तीपासून दुर पळविण्याकरिता फटाके फोडणे, धुर करणे, टीसीएम करणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात वन क्षेत्रालगतची निसर्ग पर्यटन स्थळे, किल्ले, देवस्थाने व पाणस्थळे स्थळांचा विकास आराखडा तयार केल्याबाबत

**(३६) ९९८४१ (२६-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन क्षेत्रालगतची निसर्ग पर्यटन स्थळे, किल्ले, देवस्थाने व पाणस्थळे आदींना चालना मिळावी यासाठी वन विभागाने ३२० निसर्ग पर्यटन स्थळे निवडून त्यातील ११६ स्थळांचा विकास आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासाचे स्वरुप काय आहे व यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व सदर स्थळे राज्यातील कोणत्या जिल्ह्यातील आहेत,
(३) अद्याप या अनुषंगाने निर्णयात्मक अंमलबजावणी सुरु झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) होय.
(२) निसर्ग पर्यटन आराखडयाच्या स्वरुपामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे- विश्रामगृह दुरुस्ती, सुचना फलक लावणे, सौर दिवे लावणे, स्थानीक युवकांना गाईड प्रशिक्षण देणे, पर्यटन रस्त्याची दुरुस्ती करणे, मचान बसविणे, प्रवेशदवार तयार करणे, वन्यप्राण्यांच्या प्रतिकृती बसविणे, निसर्ग पायवाट तयार करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, बालोद्यान साहित्य, पुरुष व महिलांसाठी प्रसाधन गृह तयार करणे, सोविनीयर शॉप उभारणे, पर्यटकासांठी तंबु निवास सुविधा उभारणे, पॅगोडा तयार करणे, चेनलिंक कुंपन तयार करणे, वाहनांसाठी वाहनतळ तयार करणे, उद्यानामध्ये बेंचेस, ओटे, कचराकुंडया इ. साहित्य बसविणे, बंधारे बांधणे, जलविहार नौका खरेदी करणे, निसर्ग पायवाट तयार करणे, सौर उर्जा बोरवले बसविणे इ. सन २०१७-१८ या वर्षाकरिता रु.८०००.०० लक्षाची तरतुद निसर्ग पर्यटन कामाच्या विकासाकरीता करण्यात आलेली आहे.

सदरची स्थळे खालील जिल्हयातील आहे. १.अमरावती, २.चंद्रपूर, ३.गोंदिया, ४.नागपूर, ५.यवतमाळ, ६.गडचिरोली, ७.कोल्हापूर, ८.जळगांव, ९.नाशिक, १०.औरंगाबाद, ११.पुणे, १२.ठाणे, १३.हिंगोली, १४.बीड, १५.नांदेड, १६.परभणी, १७.धुळे, १८.नंदूरबार, १९.सिरोंचा, २०.सातारा, २१.अहमदनगर, २२.वर्धा, २३.सोलापूर, २४.अकोला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील बिजूर, रामतीर्थ व सावळीयेथील वन विभागाच्या जागेवर निसर्ग वन पर्यटन केंद्र मंजूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव

**(३७) १००१३६ (२६-१२-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील बिजूर, रामतीर्थ व सावळी येथील वन विभागाच्या जागेवर निसर्ग वन पर्यटन केंद्र मंजूर करण्यासंबधीचा प्रस्ताव शासनाने प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्याकडून माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निसर्ग वन पर्यटन केंद्राचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०३-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) रामतीर्थ व सावळी या क्षेत्रात निसर्ग पर्यटनाची कामे करणे योग्य असल्यामुळे व कामे करण्यासाठी वन विभागाचे क्षेत्र उपलब्ध असल्याने प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालु आहे. बिजुर येथे वन विभागाचे वनक्षेत्र नसल्यामुळे त्या ठिकाणी निसर्ग पर्यटना अंतर्गत कामे करणे शक्य नाही.

---

**पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) परिक्षेत्र वन विभाग यांनी वनतळे खोदकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३८) १००२७९ (२६-१२-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) परिक्षेत्र वन विभाग यांनी वनतळे खोदकामात गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी चौकशीसाठी द्विसदस्यीय समिती गठीत केली असून समितीने चौकशी करुन दि.१९.०१.२०१८ अन्वये अहवाल सादर केला आहे. समितीच्या अहवालानूसार वनतळ्याच्या कामात काही अंशी गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे.
(३) सदर कामामध्ये दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी (जि. भंडारा) तालुक्यातील मुंढरी-रोहा येथील वैनगंगा नदीवरील व मोहगाव (देवी), रामपूर-मांडेसर येथील सुर नदीवरील पुल वजा बंधारा बांधण्याची मागणी**

**(३९) १०१२०३ (२६-१२-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहाडी (जि. भंडारा) तालुक्यातील मुंढरी-रोहा येथील वैनगंगा नदीवरील व मोहगाव (देवी), रामपूर-मांडेसर येथील सुर नदीवरील पुल वजा बंधारा बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंधारण मंत्री यांना दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा. विधानसभा सदस्यांच्या दिनांक ०३/०२/२०१७ च्या पत्रामध्ये ता. मोहाडी, जि. भंडारा येथील सुर नदीवरील मोहगांव (देवी),रामपूर-मांडेसर या पुल वजा बंधारा बांधकामाच्या मागणीचा उल्लेख आहे, परंतु वैनगंगा नदीवरील मुंढरी-रोहा या बंधा-याबाबत काहीही मागणी वा त्याबाबतचा उल्लेख नाही. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. (जलसंधारण) मंत्री यांना दिनांक ०८ मार्च, २०१७ वा त्यासुमारास दिलेले निवेदन शासनाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) मा. विधानसभा सदस्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मोहगांव (देवी) व रामपूर - मांडेसर (पाचगांव) ता. मोहाडी, जि. भंडारा येथील सुर नदीवरील पुलवजा बंधा-याचे बांधकाम प्रस्तावित करण्याकरिता अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती कार्यालयामार्फत प्रस्तुत बंधा-याचे सविस्तर सर्वेक्षण करून विस्तृत बांधकामाचे अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यतेस्तव मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांना सादर करण्यात आले आहे. तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांना सादर करण्यात आला आहे, आणि बंधारा व रॉफ्ट चे संकल्पचित्र मंजूर करण्यासाठीचा प्रस्ताव मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. प्रशासकिय, तांत्रिक मान्यता प्राप्त होताच निविदा प्रक्रिया पूर्ण करून बंधाऱ्याचे बांधकाम करण्याचे नियोजन आहे.

---

## वालधुर (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्याच्या जमीनीचे बेंबळा कालवे विभागाने कालव्यासाठी परस्पर भुमी अधिग्रहण केल्याबाबत

**(४०) १०१४५९ (२६-१२-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालंधुर (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील शेतकरी सुनिल मोरेश्वर भेले यांचे शेतातुन बेंबळा कालवे ची रामतीर्थ वितरीका गेली असता सबंधीत शेतकऱ्याला कोणतीही सुचना न देता वितेरीकाकरिता बेंबळा विभागाने जमीन अधिग्रहण केले असल्याचे शेतकऱ्याने दिनांक ११ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याच्या गैरहजेरीत जमीनीचे अधिग्रहण केल्याने नकाशात दर्शविल्यापेक्षा अधिक जमीन अधिग्रहीत केली, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, बेंबळा कालवे विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना विचारात न घेता परस्पर भुमी अधिग्रहण केल्याने शेतकऱ्यांना मोजमापासंबधी आक्षेप घेण्याबाबत संधी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबधित दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. भूसंपादन कार्यवाही ही भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील जलसंधारण विभागाच्या अनियामिततेबाबत**

**(४१) १०१४८३ (२६-१२-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यात सन २०१७-१८ मध्ये जलसंधारण विभागातर्फे एकूण १२.५० लक्ष रुपयाची अंदाजपत्रके तयार करून शासनाच्या तिजोरीतून खर्च करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अंदाज पत्रक तयार करतांना कोणत्याही प्रकारचे सर्व्हे न करता अंदाज पत्रक तयार करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अंदाजपत्रक तयार करतांना तांत्रिक मान्यतेकरीता भूजल निरीक्षण अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र प्रमाणित न करता अंदाज पत्रक तयार करून शासनाचा निधी खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे-महागाव व भेंडेगाव (जि.हिंगोली, ता.बसमत) येथील आसना नदीवर सिंचन क्षमता वाढविण्याबाबत**

**(४२) १०१६५४ (२६-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे-महागाव व भेंडेगाव (जि.हिंगोली, ता.बसमत) येथील आसना नदीवर सिंचन क्षमता वाढविण्यासाठी कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधणेबाबत स्थानिकांची मागणी आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त बंधाऱ्यांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता देवून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यास लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-०२-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) याबाबत को.प. बंधाऱ्याच्या जागेची प्राथमिक पाहणी केलेली असून बंधा-याचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करुन अंदाजपत्रके व नकाशे तयार करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम.आय.एम.ई.आर. मेडीकल कॉलेज तळेगाव दाभाडे या महाविद्यालयातील ३९ मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नियमानुसार फी सवलत मंजूर होणेबाबत**

**(४३) १०१७०२ (२७-१२-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एम.आय.एम.ई.आर. मेडीकल कॉलेज तळेगाव दाभाडे, पुणे व जवाहर मेडिकल फाऊंडेशन अण्णासाहेब चुडामन पाटील मेमोरियल मेडिकल कॉलेज, साक्री गल्ली, धुळे या महाविद्यालयांतील प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या प्रथम वर्ष पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमाचे स्पेशल कॉन्सीलिंगव्दारे करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, प्रवेश संस्थास्तरावरील प्रवेश न गणता त्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया अंतर्गत केलेले प्रवेश समजण्यास मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एम.आय.एम.ई.आर. मेडीकल कॉलेज तळेगाव दाभाडे या महाविद्यालयास मा. आयुक्त राज्य सामाईक कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून महाविद्यालयास प्राप्त झालेल्या १२७ विद्यार्थ्यांपैकी ५७ विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर उर्वरित ७० जागा मा. आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, यांचेकडून ३९ मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नियमानूसार फी सवलत मंजूर होणबाबत तसेच सन २०१७-१८ साठी फी सवलत व ऑनलाईन अर्ज मंजूरीसाठी कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्याकडून शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत नाही. शुल्क मंजूरीसाठी शिष्यवृत्तीचे अर्ज संबंधित विभागाकडे महाविद्यालयांमार्फत सादर करण्यात येतात व पुढील कार्यवाही संबंधित विभागामार्फत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोटगल बॅरेज (ता.जि गडचिरोली) या सिंचन प्रकल्पास मंजूर निधी मिळण्याबाबत**

**(४४) १०२००९ (०२-०१-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात वैनगंगा नदीवर कोटगल गावाजवळ कोटगल बॅरेज या सिंचन प्रकल्पास मंजूरी देण्यात आली असून या प्रकल्पाला वित्त विभागाच्या पत्र दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये रु.५ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गडचिरोली जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत माहे जुलै, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ दरम्यानचे लोकशाही दिनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये उक्तबाबत मुद्दे मांडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोटगल बॅरेज या सिंचन प्रकल्पास मंजूर निधी तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१८) :** (१) होय.

(२) याबाबत क्षेत्रिय अधीक्षक अभियंता स्तरावर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयात जुलै ते ऑगष्ट २०१७ दरम्यानचे लोकशाही दिनाचे कार्यवृत्ताचा अभ्यास केला असता सदर कार्यवृत्तात असा कोणताही मुद्या आढळून आलेला नाही.

तथापि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या दि. २९ .०७.२०११ च्या सहमतीतील अटी अन्वये या प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यापुर्वी आवश्यक वैधानिक मान्यता जसे पर्यावरण मान्यता व वन मान्यता घेणे आवश्यक आहे व याकरीता शासनाने सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाकरीता रू.७० लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. वन प्रस्ताव वन विभाग, गडचिरोली यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली आहे व आवश्यक वैधानिक मान्यता प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे डोंगरशेवली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना वन्य प्राण्याकडुन झालेल्या नुकसान भरपाईबाबत**

**(४५) १०२०७७ (२६-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरशेवली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वन्य प्राण्यामुळे होणाऱ्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना तीस दिवसाच्या आत देण्यात यावी, असा निर्णय शासनाचा असतांना येथील अनेक शेतकऱ्यांना सन २०१६ पुर्वीचे नुकसानाची रक्कम मिळालेली नसल्याचे बाब माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना नुकसानीची रक्कम मिळण्यासाठी शासनाकडुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप पर्यंत शासनाकडुन कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) व (२) मौजे डोंगरशेवली (ता. चिखली जि. बुलढाणा) येथे वन्यप्राण्यांनी केलेल्या शेतपिकांच्या नुकसान सन २०१५-१६ मध्ये १४ प्रकरणे, सन २०१६-१७ मध्ये १०६ प्रकरणे व सन २०१७-१८ (माहे डिसेंबर-२०१७) मध्ये २३ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रस्तूत प्राप्त प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीन्वये संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत परभणी जिल्हयात पावणेतीन लाख रोपांची लागवड करण्यात आल्याबाबत**

**(४६) १०२२३५ (२६-१२-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात राज्य शासनाच्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत पावणेतीन लाख रोपांची लागवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी २ लाख २५ हजार म्हणजेच ७९ टक्के झाडे सुस्थितीत असल्याचे कागदोपत्री आकडेवारी वन विभागाने दिली असतांना प्रत्यक्षात पाहणी केली असता अनेक झाडे पाण्याअभावी कोमेजून गेली असून कांही ठिकाणी तर झाडे लावल्याचे अस्तित्व नसल्याचे माहे सप्टेंबर/ऑक्टोंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्ष लागवडीच्या मोहिमेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०३-२०१८) :** (१) राज्य शासनाच्या ५० कोटी वृक्षलागवड योजनेअंतर्गत माहे जुलै, २०१७ च्या पावसाळ्यात परभणी वन विभागांतर्गत एकूण २,५४,६०० रोप लागवड करण्यात आलेली आहे.
(२) नाही.

सदर लागवड केलेल्या रोपांपैकी दि.३१.१०.२०१७ अखेर जिवंत रोपांची टक्केवारी ९५.०८ इतकी आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबे गव्हाण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील वन जमिनीवर बिबट्या संवर्धनासाठी बिबटया सफारी, पायलट प्रोजेक्ट राबविण्याच्या मागणीबाबत**

**(४७) १०२५८१ (२६-१२-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील माणीकडोह येथील बिबटा निवारण केंद्रामध्ये ४३ बिबटे ठेवण्यात आले असून या परिसरात सुमारे १५० हून अधिक बिबटे असून बिबटया संवर्धनसाठी वन विभागाच्या मालकीच्या आंबेगव्हाण येथील क्षेत्रात बिबटा सफारी, पायलट प्रोजेक्ट राबविण्यात यावा अशी तेथील नागरिकांची तसेच लोकप्रतिनिधींची मागील २ वर्षापासूनची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीचे एक निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ व तद्‌नंतर पुन्हा दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी मा.वन मंत्र्याकडे सादर केले असतानाही आतापर्यंत सदरहू प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार आंबेगव्हाण या वन क्षेत्रात बिबटया सफारी पायलट प्रोजेक्ट कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१), (२) व (३) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील माणिकडोह येथील बिबटया निवारण केंद्रामध्ये सद्यस्थितीत ३५ बिबटे ठेवण्यात आलेले आहेत. जुन्नर तालुक्यातील बिबटयाच्या नागरी क्षेत्रातील वावरावर नियंत्रणाबरोबर बिबटयांचे संवर्धन करण्याच्या दृष्टिने बिबट सफारी निर्मिती जुन्नर तालुक्यातील मौजे आंबेगव्हाण येथील राखीव वन जमिनीवर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २०.१०.२०१६ व दिनांक ०७.०३.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे.

जुन्नर येथे बिबट सफारी स्थापन करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २६.१०.२०१६ रोजी आयोजित १२ व्या बैठकीमध्ये बिबट सफारी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जुन्नर येथे बिबट सफारीची निर्मित्तीसाठी मौजे आंबेगव्हाण (ता. जुन्नर) येथील वनखंड क्रमांक २९, ३० व ३१ मधील २३४.४४ हेक्टर सलग व डोंगराळ क्षेत्रात जागा निश्चित करण्यात आलेली आहे.

बिबट सफारी स्थापन करण्यासाठी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ३८H नुसार Central Zoo Authority, New Delhi यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर परवानगी घेण्यासाठी Master Plan तयार करुन CZA च्या मंजुरीकरिता सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाचघरवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील लघुपाटबंधारे तलाव धराडेवाडी येथे होण्याबाबतची मागणी**

**(४८) १०२६०९ (२६-१२-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाचघरवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील लघुपाटबंधारे तलाव धराडेवाडी येथे होण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-०२-२०१८) :** (१) होय.

(२) मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांनी पत्र जा.क्र.ताशा/१/११३/२००५/१३६५/१३,दि.२३/८/२०१३ अन्वये घोड प्रकल्पातील नियोजित पाणी साठा ५२.६७ अ.घ.फु. असून ७५% विश्वासर्हतेने २८.११ अब्ज घ.फु. पाणी उपलब्ध होत असल्याने घोड प्रकल्पात तुट निर्माण होत असल्याने या प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाणी उपलब्ध प्रमाणपत्र देता येत नसल्याचे कळविलेले आहे.

सदर प्रस्तावित योजना ल.पा. तलाव पाचघर धराडेवाडी ता.जुन्नर ही सुध्दा घोड प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात येते. सदर योजनेस पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळू शकणार नसल्याने मौजे पाचघरवाडी ता.जुन्नर येथे लघुपाटबंधारे तलावाच्या सविस्तर सर्वेक्षण व अंदाजपत्रकाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नीट-पीजी २०१८ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येण्यासाठी दलाल दीड कोटी रुपयांची मागणी करीत असल्याबाबत

**(४९) १०२६४५ (२७-१२-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राष्ट्रीय एकता व प्रवेश परीक्षा (नीट) तसेच एमडी, एमएम, एमडीएस पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यासाठी नीट-पीजी परीक्षा येत्या दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी देशभरात होणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभ्यासक्रमामध्ये व्यवस्थापन आणि अनिवासी भारतीयांच्या कोट्यातून अर्ज भरण्यापासून ते प्रवेश मिळवून देणारी दलालांची टोळी सक्रीय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दलालांनी आकर्षक नावे ठेवून लहान कंपन्या थाटल्या असून, हमखास प्रवेश आणि नीट-पीजी परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येण्याचे आमिष सार्वजनिक माध्यमाद्वारे दाखवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामान्य महाविद्यालयासाठी दीड कोटी रुपये, तर प्रतिष्ठीत महाविद्यालयांसाठी दोन ते अडीच कोटी रुपये दलाल घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबधित दोषी व्यक्तींवर शासन स्तरावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. नीट-पीजी-२०१८ आणि नीट-एमडीएस-२०१८ या दोन्ही परीक्षा दिनांक ०७ जानेवारी,२०१८ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत.

(२) एमबीबीएस वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळवून देण्याबाबत फसवणूकीची तक्रार सीबीडी पोलीस ठाणे येथे दोन, विरार पोलीस ठाणे, सावर्डे पोलीस ठाणे, तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, नांदगाव (नाशिक ग्रामीण) पोलीस स्टेशन, पोलीस स्टेशन वणी, पोलीस स्टेशन वसंतनगर, पुसद, जि.यवतमाळ येथे प्रत्येकी एक तक्रार प्राप्त झालेली आहे.

(३) होय, हे अंशतः खरे आहे. विरार पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फसवणूकीच्या तक्रारीची बाब दैनिक 'पुण्यनगरी' वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने घडली असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे.

(४) हे अंशतः खरे आहे. नांदगाव (नाशिक ग्रामीण) पोलीस ठाणे येथे तक्रारदाराने मॅनेजमेंट कोटयातून ॲडमिशनसाठी रुपये सत्तर लाख इतका खर्च येणार असल्याचे फिर्यादीमध्ये नमूद केले आहे.

(५) पोलिसामार्फत तपास सुरु आहे. पोलिसांना प्राप्त एकूण ८ तक्रारींपैकी ०३ न्यायप्रविष्ट आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील होमिओपॅथीक डॉक्टरांसाठी फार्माकॉलॅजी कोर्स सुरु करण्याबाबत**

**(५०) १०३०२० (२७-१२-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमिओपॅथीक डॉक्टरांसाठी शासनाने फार्माकॉलॅजी कोर्स सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोर्ससाठी राज्यातील ६५००० डॉक्टरांपैकी फक्त ७५० जणांना प्रवेश देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या डॉक्टरांची सेवा ग्रामीण भागात, दुर्गम भागात उपलब्ध होत असल्यामुळे फार्माकॉलॅजीचा अभ्यासक्रम राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, वैद्यकीय कॉलेज इ. ठिकाणी तातडीने सुरु करावा व एक वर्ग सर्व ६५००० डॉक्टरांना एकाच वेळी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सदर लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) होय, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

(४) सन २०१६-१७ मध्ये होमिओपॅथिक डॉक्टरांसाठी आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या एकूण ७०० जागा होत्या. तसेच सन २०१७-१८ मध्ये एकूण १२०० जागा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. ज्या खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांत सदर अभ्यासक्रम सुरु नाही, त्यांनीही सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्या स्तरावरुन आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.